# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांकः11.02.2026 वारः बुधवार

---

1. 2026-27 च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर संसदेत विविध मुद्यांवर चर्चा
2. समाजमाध्यवरील कृत्रिम बुध्दीमत्ता आधारित किंवा डीपफेक संदेश काढून टाकण्यासाठी संबंधित प्लॅटफॉर्मला तीन तासांची मुदत
3. केंद्रिय तपास संस्थांनी सायबर सुरक्षेसाठी एकत्रित काम करावं गृहमंत्री अमित शहा यांचं आवाहन आणि
4. आशियाई नेमबाजी स्पर्धेत भारतीय नेमबाज 39 पदकांचा सुवर्णवेध घेत स्पर्धेत अव्वल स्थानी

**संसद**

आंतरराष्ट्रीय स्तरावर राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या अशांत काळात भारत हा आर्थिक विकास आणि स्थिरतेचे उदाहरण म्हणून उभा आहे. असं शिवसेना खासदार मिलिंद देवरा यांनी काल राज्यसभेत 2026-27 च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चेत भाग घेताना सांगितलं. हा अर्थसंकल्प आर्थिक विकास दर वाढवणे, लोकांच्या अपेक्षा पूर्ण करणे आणि सामाजिक क्षेत्रात सर्व योजना लोकांपर्यंत पोहोचतील याची खात्री करण्याला प्राधान्य देत असल्याचं भाजपचे सुरेंद्र सिंह नागर यांनी म्हटलं आहे. बालकांशी संबंधित योजनांच्या खर्चात घट झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार पक्षाच्या फौजिया खान यांनी चिंता व्यक्त केली. लोकसभेत काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी चर्चेला सुरुवात केली. सरकारी खर्च कमी झाला आहे आणि कर प्रणालीत कोणताही बदल नाही अशी टीका त्यांनी केली. या वर्षीच्या अर्थसंकल्पात बेरोजगारी, महागाई आणि असमानता अशा बाबी दुर्लक्षित असल्याचा आरोप त्यांनी केला. समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे अनिल देसाई, जेडीयूचे दिलेश्वर कामैत, भाजपचे डॉ. डी. पुरंदेश्वरी आणि इतर पक्षाच्या खासदारांनीही सभागृहात आपापले मुद्दे मांडले. संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आज 2026-27 च्या केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा पुन्हा सुरू होणार आहे.

**संसद**

दरम्यान, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यावरचा अविश्वास दर्शक ठराव विरोधी पक्षांनी काल लोकसभेच्या महासचिवांना सादर केला. काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्षासह विविध पक्षांच्या 118 सदस्यांनी याला पाठिंबा दिला आहे. या अविश्वास दर्शक ठरावावर जोपर्यंत निर्णय होत नाही, तोपर्यंत लोकसभेच्या कामकाजात सहभागी न होण्याचा निर्णय सभापती ओम बिर्ला यांनी घेतला आहे.

**एस. जयशंकर**

ब्रिक्स 2026 परिषदेतील विविध देशांच्या प्रतिनिधींशी परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल संवाद साधला. ब्रिक्स संघटना 20 वर्षे पूर्ण करत असताना, आंतरराष्ट्रीय सहकार्य, परस्पर हिताच्या मुद्यावर सल्लामसलत आणि समन्वयासाठी हे एक मौल्यवान व्यासपीठ असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे. नवोन्मेष, सहकार्य आणि शाश्वततेच्या प्राधान्य देत विविध देशांच्या प्रतिनिधी मंडळांनी केलेल्या सूचना आणि दृष्टिकोन यांचा विचार करून ब्रिक्सची पुढील वाटचाल होत राहील असंही ते म्हणाले. गेल्या 9 तारखेपासून नवी दिल्ली इथं सुरु असलेल्या ब्रिक्स परिषदेचा आज समारोप होईल.

भारतानं युनायटेड किंग्डम आणि उत्तर आयर्लंडसोबत सामाजिक सुरक्षितता योगदानाशी संबंधित सामाजिक सुरक्षेवरील करारावर स्वाक्षरी केली आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री आणि भारतातील ब्रिटिश उच्चायुक्त लिंडी कॅमेरॉन यांनी काल नवी दिल्ली इथं या करारावर स्वाक्षरी केली. या करारामुळं दोन्ही देशांच्या कर्मचाऱ्यांना एकमेकांच्या प्रदेशात तात्पुरत्या नियुक्तींवर 36 महिन्यांपर्यंत दिलं जाणारं योगदान टाळण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे.

हा करार भारताच्या युकेसोबतच्या व्यापार कराराचा एक भाग आहे आणि व्यापक आर्थिक व्यापार करारासह तो अंमलात येईल.

**डिपफेक**

केंद्र सरकारनं समाज माध्यमांचं संयोजन करणाऱ्या कंपन्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे निर्मित डीपफेक सामग्री काढून टाकण्यासाठी 3 तासांची अंतिम मुदत दिली आहे. सरकारनं कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे निर्मित आणि सिंथेटिक सामग्रीची औपचारिक व्याख्या करणाऱ्या माहिती तंत्रज्ञान नियमावली, 2021 मधील सुधारणा काल अधिसूचित केल्या आहेत. अधिकृत अधिसूचनेनुसार डिजिटल मंचांना एआय लेबल्स किंवा संबंधित मेटाडाटा लागू झाल्यानंतर ते काढून टाकण्यास किंवा दडपण्यास परवानगी देण्यावरही बंदी घालण्यात आली आहे. नवीन नियम येत्या 20 फेब्रुवारीपासून लागू होतील.

**अमित शाह**

केंद्रिय अण्वेषण विभाग आणि सायबर गुन्हे शाखा समन्वय केंद्र यांनी केंद्रिय तपास संस्था अर्थात एनआयए, सक्तवसुली संचालनालय आणि बँकांसारख्या इतर संस्थांसोबत संयुक्त प्रणाली विकसित करावी असं आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी काल केलं. नवी दिल्लीत सुरु असलेल्या 'सायबर गुन्हेगारी संदर्भातील फसवणूक आणि गुन्हे करणाऱ्या परिसंस्थेचे उच्चाटन' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेला संबोधित करताना ते बोलत होते. राष्ट्रीय स्तरावरील एकत्रित आणि अत्यंत सुरक्षित यंत्रणा तयार करून गुन्हे करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या सायबर गुन्हेगारांना रोखण्यासाठी आपल्याला दोन पावले पुढे राहावे लागेल अस आवाहनही त्यांनी केलं.

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन या महिन्याच्या 17 तारखेपासून तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहेत. मॅक्रॉन 19 फेब्रुवारी रोजी नवी दिल्ली इथं होणाऱ्या एआय इम्पॅक्ट समिटमध्ये सहभागी होतील. अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयानं दिली आहे.  या भेटीदरम्यान, दोन्ही नेते होरायझन 2047 रोडमॅपमध्ये नमूद केलेल्या विविध क्षेत्रांमध्ये द्विपक्षीय सहकार्य मजबूत करण्यावर चर्चा करतील.

**भारत-अमेरिका**

भारत-अमेरिका दरम्यान झालेला व्यापार करार भारताच्या औषधनिर्माण क्षेत्रासाठी सकारात्मक आणि स्थिर विकासाठी महत्वाचा असल्याचं आयुर्वेदिक औषध उत्पादक संघटनेनं म्हटलं आहे. संघटनेचे अध्यक्ष डॉ. प्रदीप मुल्तानी काल पत्रकारांशी बोलत होते. औषधनिर्माण, विशेषतः जेनेरिक औषधे, त्यावरील प्रतिकूल शुल्क याबाबतीत या करारामुळे महत्त्वपूर्ण धोरणात्मक रचना निश्चित करते. असं ते म्हणाले . दरम्यान, उत्पादन क्षमता आणि कामगारांची उलब्धता या बाबी महत्वाच्या बाबींचा विचार करता चीनपासून दूर जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या अमेरिकन कंपन्यांसाठी भारत हा एक व्यवहार्य पर्याय असल्याचं अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी आणि राजदूत जेमिसन ग्रीर यांनी म्हटलं आहे. अलिकडेच झालेल्या भारत-अमेरिका अंतरिम व्यापार कराराबद्दल, ग्रीर यांनी काल वॉशिंगटनमध्ये बोलताना भारताच्या वचनबद्धतेबाबत आशा व्यक्त केली. एका दूरचित्रवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. हा खरोखरच एक महत्त्वाचा करार असणार आहे आणि येत्या अनेक वर्षांत त्याचे परिणाम प्रतिध्वनीत होणार आहे. असंही ते म्हणाले

**दुबई-परिषद**

दुबईतील सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापिठात कालपासून दोन दिवसांची 'रोड टू एआय इम्पॅक्ट समिट' सुरू झाली. अबू धाबी इथं भारतीय दूतावासाच्या सहकार्याने हे आयोजन करण्यात आलं आहे. या महिन्याच्या 16 तारखेपासून नवी दिल्लीत होणाऱ्या एआय इम्पॅक्ट समिटच्या पार्श्वभूमीवर ही बैठक होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा उद्देशपूर्ण वापर आणि त्याचा सामाजिक विपरित परिणाम टाळण्यासाठी तसंच धोरणनिश्चिती करण्यासाठी धोरणकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी विचारविनिमय करत आहेत. युएईमधील भारताचे राजदूत डॉ. दीपक मित्तल आणि दुबईतील भारताचे कॉन्सुल जनरल सतीश सिवन यांच्यासह इतर मान्यवर या कार्यक्रमासाठी उपस्थित आहेत.

**नेमबाजी**

नवी दिल्ली इथं झालेल्या आशियाई रायफल आणि पिस्तूल अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय नेमबाजांनी काल आणखी  सुवर्णवेध घेत पदकांची संख्या 39 वर नेली. प्राची गायकवाडने महिलांच्या कनिष्ठ गटांत 50 मीटर रायफल थ्री-पोझिशन प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. सांघिक स्पर्धेत कनिष्ठ गटात महिलांनी 50 मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात आणखी एक सुवर्णपदकांवर आपलं नाव कोरलं आणि या स्पर्धेत एकंदर 1 हजार 748 गुणांची कमाई करत अव्वल स्थानी आहे.

**भूकंप**

पॅसिफिक महासागरात 6 रिख्टर क्षमतेचा भूकंपाचा धक्का बसला. अमेरिकेच्या राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्रानं सांगितले की, भूकंप 515 किलोमीटर खोलीवर झाला. म्यानमा आणि बांगलादेशसारख्या प्रदेशात या भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपामुळे झालेलं नुकसान किंवा जखमींची अद्याप माहिती नाही.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार